# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)**

## परिपत्रक

विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार विद्यापीठातील सर्व शैक्षणिक विभागांना तसेच प्रशासकीय शाखांना खालील आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

१) ज्या खरेदी आदेशांची (कार्यालयीन साधने व उपकरणे, शास्त्रीय सामग्री व उपकरणे) पुर्तता होऊन खरेदी वस्तु विभागास प्राप्त झाल्या असतील अशा खरेदी आदेशांची देयके चालू आर्थिक वर्षातील तरतुदींमधून अदा करण्यात यावी.

२) ज्या खरेदी आदेशांची (फर्निचर) पुर्तता होऊन खरेदी वस्तु विभागास प्राप्त झाल्या असतील अशा खरेदी आदेशांची देयके चालू आर्थिक वर्षातील स्थावर विभागाच्या केंद्रीय तरतुदीमधून अदा केली जातील.

३) जे खरेदी आदेश अदयाप प्रलंबित आहेत असे सर्व खरेदी आदेश स्थगित ठेवण्यात यावेत.

४) दरवर्षी विभागाच्या अर्थतरतुदींच्या अंतर्गत पुनर्नियोजनाचे प्रसताव ३० सप्टेंबर नंतर स्विकारण्यात येतात व वित्त व लेखा समितीच्या माध्यमातून त्यांना मंजूरी मिळते. परंतू गेले ५ महिने चाललेला लॉकडाऊन व कोविड-१९ साथीमुळे अनेक विभागांच्या अर्थनियोजनात बदल होऊ शकतात, त्यामुळे सर्व विभागांचे पुनर्नियोजनाचे प्रस्ताव ३१ ऑगस्ट, २०२० पर्यंत विभागप्रमुखांनी वित्त व लेखा विभागास सादर करावे, त्या सोबत फेब्रुवारी, २०२० अखेर किती टक्के मंजूर तरतुदींचा विनियोग केला ते नमुद करावे.

५) आर्थिक वर्ष २०२०-२१ मध्ये कोणतीही नवीन अथवा जादा अर्थतरतुद करण्यात येणार नाही.

सर्व विभागप्रमुख आणि प्रशासकीय शाखाप्रमुखांनी वरील प्रमाणे माहिती दि.३१/०८/२०२० पर्यंत किंवा पुर्वी वित्त व लेखा विभागास सादर करावी.

AB Patankar

(सीए अतुल पाटणकर)
वित्त व लेखा अधिकारी

**जा.क्र** : वित्त/२०२०-२१/३३७

**दिनांक**: १९/०८/२०२०

**प्रति:**

१) मा. सर्व विभागप्रमुख/प्रशासकीय शाखाप्रमुख, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे -७

२) सर्व केंद्रीत/विकेंद्रीत वित्त शाखाप्रमुख, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे -७